महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिकविभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांवशिवार,
न्युइंग्लिशस्कुलजवळ, मुंबईआग्रारोड,
नाशिक— ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaonshivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com

क्र./नाविमं/ माध्य/ब—१/ ८५५
नाशिक—४२२००३
दिनांक:— ०१/०८/२०२०
१०

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार.

**विषय :—मार्च—२०२० मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या गुणपत्रिका व संपादणूक अहवाल पाठविणेबाबत...**

मार्च—२०२० मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या शाळेतून प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या मुळ गुणपत्रिका व विदयार्थी संपादणूकीचा अहवाल (माध्यमिक शाळा रजिस्टर) या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे.

उपरोक्त साहित्य प्राप्त होताच सदर साहित्य शाळा रजिस्टरनुसार बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करून पोहोच पावती या कार्यालयाकडे त्वरीत पाठवावी. सदर गुणपत्रिका संबंधित विदयार्थ्यांना देण्यात याव्यात एखादया विदयार्थ्याची गुणपत्रिका आपणास प्राप्त न झाल्यास मंडळ प्रतिनिधीकडे त्याचवेळी किंवा दुस—या दिवशी फॅक्सद्वारे/ई—मेलद्वारे किंवा हस्तपोच माहिती मंडळास कळविल्यासच दखल घेण्यात येईल. विलंबाने कळविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

जर गुणपत्रकातील नोंदीत काही तफावत/चुका/त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत आवश्यक कागदपत्रासह तसे या कार्यालयास तात्काळ निदर्शनास आणून मुळ गुणपत्रक दुरूस्तीसाठी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. विदयार्थ्याच्या नावातील दुरूस्ती असल्यास आपल्या माध्यमिक शाळेचे जनरल रजिस्टर व त्याची छायाप्रत सांक्षाकिंत करून मंडळात समक्ष सादर करणे आवश्यक आहे. नाव दुरूस्ती बाबत माध्यमिक शाळेचे लेखी पत्र व प्रत्येक दुरूस्ती साठी शुल्क राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षाद्वारे/बॅक ऑफ इंडीयाच्या चलनाद्वारे/मंडळकार्यालयात रोखीने सादर करावे. नाव दुरूस्ती प्रस्तावासोबत शाळा सोडल्याच्या दाखल्याची व जनरलरजिस्टरची सांक्षांकित छायाप्रत व इ.१०वी उत्तीर्णतेबाबतचे गुणपत्रक/प्रमाणपत्रांची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

सदर गुणपत्रिकांचे वाटप विदयार्थ्यांना करण्यापूर्वी गुणपत्रिका आपल्याच माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांची असल्याची प्रथम खात्री करावी. तसेच गुणपत्रिकेवरील विदयार्थ्याचे नाव, विषय, माध्यम,मा.विभागीय सचिवांची स्वाक्षरी, मंडळाचा लोगो, गुणपत्रिकालॅमिनेशन बरोबर असल्याची खात्री करूनच संबंधित विदयार्थ्यांना दयावी. तसे नसल्यास ती गुणपत्रिका मंडळाकडे तात्काळ परत पाठवावी किंवा मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निकालानंतरच्या दुरूस्तीबाबतच्या शुल्काचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र | दुरूस्तीचा तपशील | दुरूस्ती शुल्क |
|---|---|---|
| १ | श्रेणी/प्रात्य./मौखीक/अंतर्गत मुल्यमापन इ. गुण/श्रेणी निकालानंतर सादर करणे | रू.५०/— प्रतिदिन |
| २ | विषय सूट, श्रेणी दुरूस्ती, विषय बदल, प्रात्यक्षिक गुण/मौखीक गुण अंतर्गत मुल्यमापनाचे गुण यामधील कोणत्याही एका तरतुदीच्या कार्यवाहीसाठी | रु. १०००/— (शाळेस दंड) |
| ३ | गुणतक्ते चुकीचे सादर करणे | रू.५०/- प्रति गुणयादी |
| ४ | गुणपत्रिकातील प्रत्येक दुरूस्तीसाठी | रू.५०/—प्रति चूक |
| ५ | गुणपत्रक/प्रमाणपत्र नवीन देणे | रू. १००/— |
| ६ | लॅमिनेशन | रू. १०/— |

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ नाशिक ४२२ ००३.

टीप—नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे—महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय मंडळ, सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक— ४२२ ००३

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००३.

---

# पोहोच पावती

| शाळा सांकेतांक | S | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

प्रति,
मा.विभागीय सचिव,
नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३.

**विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्ष मार्च-२०२० परीक्षेचे गुणपत्रक मिळण्याबाबत.**

महोदय,

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च-२०२० परीक्षेस आमच्या शाळेतून प्रविष्ठ झालेल्या एकुण __ विद्यार्थ्यांचे मुळ गुणपत्रक आज दिनांक / /२०२० रोजी प्राप्त झालेले असून त्याची पडताळणी केली असता ते आमच्या शाळेचे असून विद्यार्थी संख्येनुसार बरोबर आहेत.

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक/प्रतिनिधी
नाव- ---------------------------
मोबाईल क्रमांक -
लपिक मोबाईल क्रमांक -